# निविदा

महाराष्ट्र शासन
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय , मुंबई- ४०० ०३२

Email ID : compcell.mhpds@gov.in

---

क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.५६/सं.क. दिनांक : २८ ऑगस्ट,२०२५

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मातंस/नस्ती ०७/प्र.क्र.८९/३९, दि.१.८.२०११ नुसार विभागातील खालील संगणक साहित्य निर्लेखित करण्यात आले आहे.

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | ऑल इन वन संगणक | ८ |
| २ | एसर-सिपीयु-मॉनिटर सेट | ७ |
| ३ | एचपी सिपीयु | १ |
| ४ | झेरॉक्स मशिन | १ |
| | **एकूण** | १७ |

२. उपरोक्त संगणक साहित्याची (ई-कचरा) विल्हेवाट E Waste (Management and Handling,२०२१) नुसार सार्वजनिक आरोग्य व पर्यावरणास बाधा न आणता करावयाची आहे. तरी या ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आपल्या संस्थेचे दर प्रती नग याप्रमाणे या कार्यालयास दि. ०४ सप्टेंबर,२०२५ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत उप सचिव,संगणक कक्ष, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, रुम नं. २१८, दुसरा मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ या पत्त्यावर मोहरबंद पाकीटातून टपालाने पाठवावे अथवा स्वत: आणून देण्यात यावेत. आपल्या संस्थेची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. वरील संगणक साहित्य जसे आहे त्या स्थितीत आपणांस उपलब्ध करुन देण्यात येतील, याची नोंद घेण्यात यावी. प्राप्त झालेले दरपत्रक त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता, संबंधित दरपत्रक धारकांच्या उपस्थितीत उप सचिव (संगणक कक्ष) यांच्या दालनात उघडण्यात येतील. तसेच कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रक नाकारण्याचा हक्क या कार्यालयाचे विभाग प्रमुख यांना राखून ठेवत आहेत.

(प्रज्ञा फटे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग